ISSN-2581-8848

# महिला सबलीकरण सद्यस्थिती

डॉ. शुभांगी एस. माने
प्रा. राणी एम. कांबळे
म्हैसाळ महाविद्यालय, म्हैसाळ
ता. मिरज, जि. सांगली.

**गोषवारा :** प्राचीन काळामध्ये वैदिक कालखंडामध्ये भारतीय समाज जीवनात स्त्रियांना मानाचे स्थान होते. कुटुंबात स्त्रियांना आदराने वागविले जात असे. स्त्री ही कुटुंबातील प्रमुख हालचालीचे केंद्रस्थान मानले जाई. त्यामुळे कुटुंबात स्त्रीचे स्थान मानाचे व अधिकाराचे होते. वेदकाळ व रामायण-महाभारत काळात धर्मपत्नीला गृहलक्ष्मी मानण्यात येई. समाज जीवनात स्त्रीयांचे स्थान आदर्श दर्जा असलेले होते. स्त्री मुक्तपणाने समाजातील धार्मिक-सामाजिक क्षेत्रात पुरुषांबरोबर सहभागी होई. समाजात पडदा पध्दती प्रचलित नव्हती.

**पारिभाषिक संज्ञा :** महिला सबलीकरण, स्त्री-पुरुष असमानता, स्त्री उत्थान.

**प्रस्तावना :** उत्तर वैदिक काळामध्ये आणि मध्ययुगीन कालखंडामध्ये स्त्रियांवरती अनेक बंधने यायला सुरवात झाली. या काळात स्त्रियांचा दर्जा अतिशय खालावला. मुस्लीम संस्कृतीचा भारतीय समाज जीवनात प्रभाव पडल्यावर त्याचे परिणाम तत्कालीन हिंदू समाजावरही उमटले. तसेच भारतीय पुराणे, संस्कृती, परंपरा चाली रिती इत्यादीचा प्रभाव ही तत्कालीन हिंदू स्त्री-जीवनावर पडला. स्त्रियांनी उपभोगावयाचे स्वातंत्र्य, हक्क, शिक्षण इत्यादीबाबतीत पूर्वीच्या सनातन हिंदू समाजाची प्रवृत्ती धार्मिकदृष्ट्या अधिक सनातनी बनली व स्त्रियांसाठी पूर्वीपेक्षा अधिक संकुचित झाली. परिणामत: समाजातील स्त्रियांचे स्थान व दर्जा अधिकच खालावला.

ब्रिटिश कालखंडात सुध्दा स्त्रियांचा दर्जा खालावलेलाच होता परंतु काही समाजसुधारकांच्या प्रयत्नाने एकोणीसाव्या शतकामध्ये स्त्रियावरती होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम सुरू झाले त्यातूनच महिला सबलीकरणाची संकल्पना पुढे आली.

ISSN-2581-8848

**व्याख्या :** कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातून, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय इ. सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासासाठी संधी उपलब्ध करून देणे आणि स्त्री-पुरुष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला महिला सबलीकरण असे म्हणतात.

**संकल्पना :** महिलांचे सबलीकरण होणे म्हणजे तिचे व्यक्तिमत्व एक माणूस म्हणून विकसित करायचे व तिला तशी संधी मिळवून द्यायची. महिलांना कोणत्याही भेदभावाशिवाय प्रगती करण्याची संधी द्यायला हवी. कारण, प्रत्येक वेळी ती अबला आहे तसेच तिला काही कळत नाही. ती सक्षम नाही असे म्हटले जाते तसेच विविध जातीधर्माच्या स्त्रियांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. स्त्रियांच्या अंगी असणारी सहनशक्ती, संयम या गुणांमुळे तिला प्रत्येक वेळी गृहित धरले जाते परंतु झाशीची राणी लक्ष्मीबाई ते आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना गार्ड ऑफ देणारी पुजा ठाकुर यांच्या उदाहरणावरून स्त्रिया किती सक्षम आहेत हे दिसून येते. आज महिलांसंदर्भात विविध विकास योजना राबविल्या जात आहेत. त्यांचा विकास होण्यास प्रारंभदेखील झाला आहे. परंतु ही विकासाची वाटचाल सातत्याने टिकवावी लागेल. समाजाला स्त्रियांच्या समस्यांबाबत जागृत करणे आवश्यक आहे.

**स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये महिला सबलीकरणासाठी झालेले प्रयत्न :** स्वातंत्र्यपूर्व काळात जसे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी विचारवंताची एक फळी निर्माण झाली तशाच प्रकारे समाजात असलेल्या रूढी परंपरा नष्ट करून स्त्रियांना सन्मान मिळवून देण्यासाठी एक समाजसुधारकांची साखळी निर्माण झाली त्यांच्या कार्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

**महिला सबलीकरणासाठी समाजसुधारकांनी केलेले कार्य :**

**१) राजा राममोहन रॉय :** १९ व्या शतकामध्ये भारताचे आद्य समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडली. त्याकाळी समाजामध्ये अनेक रूढी, प्रथा, परंपरा अस्तित्वात होत्या. त्या प्रथांनी स्त्रियांवरती

अनेक अत्याचार केले होते. बालविवाह, सतीप्रथा, विधवा पुनर्विवाह बंदी, बालहत्या यासारख्या प्रथा अस्तित्वात होत्या त्यापैकी सर्वात अनिष्ट प्रथा म्हणजे सतीप्रथा होय. ही प्रथा कायदेशीररित्या मोडून काढण्याचे कार्य लॉर्ड विल्यम बेनटिंगच्या सहाय्याने (१८२९) राजा राममोहन रॉय यांनी केले. तसेच समाजात होणाऱ्या स्त्रियांवरच्या अत्याचारांना वाचा फोडली.

**२) महान महर्षी धोंडो केशव कर्वे :** १९ व्या शतकात बालविवाह, बालविधवा, केशवपन, व्दिभार्या, सती जाणे ह्यासारख्या जाचक रूढीमध्ये स्त्री बांधली गेली होती अशा काळात महर्षींनी स्वत: पुनर्विवाह करून महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर ज्यांनी असे पुनर्विवाह केले त्या मंडळीचा मेळावा घेऊन सन १८९३ साली विधवा विवाहोतेजक मंडळाची स्थापना केली तसेच स्त्रियांना शिक्षण मिळावे म्हणून महर्षींनी स्त्रियांसाठी आश्रमशाळा व महिला महाविद्यालयांची स्थापना केली.

**३) महात्मा जोतिराव फुले :** महात्मा जोतिराव फुले हे भारतीय समाजसुधारक होते. त्यांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य खूप मोलाचे आहे. त्यांनी भारतात पहिली मुलींची शाळा सुरू केली. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी काम केले. तसेच विधवा विवाहास सहाय्य केले. आत्महत्या प्रतिबंध गृहाची स्थापना केली. विधवांच्या केशवपनाविरुध्द कार्य केले. महात्मा फुले यांनी “सत्यशोधक समाजाची” स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचविणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना साक्षर केले. त्यानंतर त्यांनी पुण्यामध्ये पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ ही महात्मा ज्योतिराव फुले यांनी रोवली.

**४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक कार्ये :** स्त्री शोषण थांबवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी “हिंदू कोडबील” आणले. घटस्फोटाचा अधिकार, पिताच्या मालमत्तेत मुलीला मुलाएवढा वाटा यासारख्या गोष्टी कायद्यानेच आणल्या वर स्त्रियांचे भौतिक व मानसिक शोषण थांबवता येईल असे त्यांचे प्रामाणिक मन होते. कारण हुंडाबळी हा आज भारतातील अनेक राज्यांचा प्रश्न आहे. अलीकडे हुड्यांचा

प्रश्न हा महाराष्ट्राचा गंभीर प्रश्न झालेला दिसून येतो. कारण मुंबईत १११ हुंडाबळीची वाढ झालेली दिसून येते त्यामुळेच संपूर्ण भारतात महाराष्ट्राचा हुंडाबळीत तिसरा क्रमांक लागतो.

**५) पंडिता रमाबाई :** १९८२ मध्ये पंडिता रमाबाईनी “आर्य महिला समाज” ही पहिली स्त्रियांची संघटना स्थापन करून स्त्री-मुक्तीच्या कामाला संघटनात्मक स्वरूप प्राप्त करून दिले. या रूढी परंपरामुळे स्त्रियांचे शोषण करणाऱ्या बालविवाह, विधवांचे केशवपन इ. जाचक रूढी विरुध्द जनमत तयार करावयाचे त्यांनी काम केले. त्याचबरोबर स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी रमाबाईनी शारदासदन आणि मुक्तीसदन या संस्थाची स्थापना स्त्रियांना सुतारकाम, छपाई, शिवणकाम, भरतकाम, लोहारकामे, परिचारिकेचे काम शिकवून स्वावलंबनासाठी उपयुक्त ठरणारी कौशल्ये शिकवण्यावर भर दिला.

**महिला सबळीकरणासाठी स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचे प्रयत्न :** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रियांच्या शिक्षण घेण्याच्या संख्येत वाढ झाली. त्यामुळे स्त्रियांना आपले हक्क व अधिकार माहिती झाले. संविधानाच्या माध्यमातून आणि विविध स्त्री संघटनेच्या माध्यमातून स्त्री व पुरुष समानता ही संकल्पना पुढे आली. भारतात स्त्रियांना अनेक कायदेशीर व्यवस्थेद्वारे त्याच्या अधिकारांना सुरक्षा व संरक्षण देण्याबरोबरच स्त्रियांकरिता सरकारद्वारा अनेक विकास कार्यक्रम व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. याचा उद्देश म्हणजे स्त्रियांच्या जीवनमानात सुधारणा होऊन देशाच्या विकासात स्त्रियांचा सहभाग वाढेल कारण स्त्रियांच्या प्रगतीशिवाय राष्ट्राची प्रगती अशक्य आहे. भारत सरकारद्वारा स्त्री सशक्तीकरण करण्याच्यादृष्टीने अनेक योजना राबविण्यात येत आहेत. केंद्र सरकारच्या योजनांचा मुख्य उद्देश स्त्रियांना स्वतंत्र करण्याकरिता व त्यांचा विकास करण्याच्यादृष्टीने व्यवसाय प्रशिक्षण चालविणे, संकटात असलेल्या स्त्रियांना पुनर्वसन करण्याकरिता वसतीगृहाची व्यवस्था करणे, कौटुंबिक समस्या, मानसिक तणाव, अत्याचार, शोषण व पीडित स्त्री व बालिका यांच्या करिता निवास व्यवस्था, ग्रामीण स्त्रियांची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता ग्रामीण क्षेत्रीय स्त्री व बालविकास कार्यक्रम इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण

कार्यक्रम चालविले जातात. तसेच केंद्र सरकारद्वारे स्त्रियांना सक्षम बनविण्याकरिता स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे त्यांच्यात सामाजिक चेतना व जागरूकता निर्माण करण्याकरिता देशात प्रचार व प्रसार माध्यमांचा पूर्ण उपयोग केला जात आहे. याशिवाय स्वयंसेवी संघटना व इतर संस्थांचे सुध्दा स्त्री उत्थानाच्या क्षेत्रात पूर्ण योगदान प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारने केलेले प्रयत्न स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने अभिनंदनीय आहेत. परंतु स्त्रियांना समाजात चांगले स्थान मिळवून देण्याकरिता प्रयत्न करणे आवश्यक आहेत. स्त्रियांची स्थिती बदलण्याकरिता सर्व सरकारी आणि कायदेशीर प्रयत्न तेव्हाच यशस्वी होऊ शकतात जेव्हा संपूर्ण समाजाची वैचारिक पातळी पूर्वगृह इत्यादीमध्ये बदल होतील.

**आंतरराष्ट्रीय पातळीवर महिला सबलीकरण :** महिला सबलीकरणासाठी सर्व प्रथम १९८५ मध्ये नैरोबी येथे आंतरराष्ट्रीय संमेलनाद्वारे प्रयत्न करण्यात आले. यात महिलांना पुरुषाबरोबर वैधानिक, राजकीय, शारीरिक, मानसिक व आर्थिक क्षेत्रात तसेच कुटुंब समुदाय व समाजात आणि राष्ट्रीय तसेच सांस्कृतिक क्षेत्रात निर्णय घेण्याच्या स्वायत्ततेबाबत विचार मांडण्यात आला. प्रत्येक स्त्रीला मानवी अधिकार प्राप्त व्हावे मूलभूत अधिकार प्राप्त व्हावे याकरिता संयुक्त राष्ट्र संघाने महिला सबलीकरणाचे प्रयत्न सुरू केले. स्त्रियांसाठी मानवतावादी व जनकल्याणाचे कार्यक्रम राबविणे सुरू केले आहे. त्याकरिता आंतरराष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आणि ८ मार्च हा जागतिक महिला दिवस म्हणून साजरा करण्यात येऊ लागला. स्त्रियांच्या प्रश्नांना अग्रक्रम देण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७५ हे वर्ष “आंतरराष्ट्रीय महिला वर्ष” म्हणून घोषित केले.

**निष्कर्ष :**

१) मध्ययुगीन आणि स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये स्त्रियांवरती अनेक बंधने असली तरी १९ व्या शतकात समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे स्त्रियांची स्थिती आणि दर्जा सुधारलेला दिसतो.

२) स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढ्या पुरतेच न राहता महिला सबलीकरणामुळे स्त्रिया राजकारण, समाजकारण आणि अर्थकारणात सक्रिय झालेल्या दिसून येतात.

३) महिला सक्षमीकरणाच्या प्रशिक्षणासाठी, राज्य, केंद्र आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक प्रशिक्षणाच्या सोयी निर्माण झाल्यामुळे महिला विविध क्षेत्रात भरारी घेताना दिसत आहेत.

असे असले तरी अजूनही समाजात स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन दुय्यमच दिसतो. आपल्या कार्यकर्तृत्वाने स्त्रियांनी अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली असली तरी प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रियांचा लैंगिक छळ होताना दिसतो. स्त्रिया राजकरणात सक्रिय होऊन देखील सर्व सत्ता पुरुषांच्या हातीच केंद्रीत असलेली आढळते. अजूनही समाजात हुंडाबळी, बालविवाह, घटस्फोट, बलात्कार यासारखे अत्याचार स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात होत असलेले दिसून येतात.

**सूचना :**

१) स्त्रियांकडे स्त्री ही दुय्यम आहे असे न बघता समाजाने आणि खास करून पुरुषप्रधान संस्कृतीने तिला मानवतेच्या भावनेतून बघितले पाहिजे.

२) शहरी भागात स्त्रियांच्या शारीरिक शिक्षणाच्या सोयी असल्या तरी ग्रामीण भागात त्या उपलब्ध नाहीत. त्या ग्रामीण भागात ही निर्माण झाल्या पाहिजेत.

३) हुंडाबळी, बलात्कार यासारख्या गुन्हयामध्ये गुन्हेगाराला कडक आणि तात्काळ शिक्षा झाल्यास स्त्रियांवरती होणाऱ्या अत्याचाराला आळा बसून खऱ्या अर्थाने महिला सबलीकरण यशस्वी होईल.

**संदर्भ सूची :**

१) www.me.m.wikipedia.org

२) www.beedlive.com

३) महाराष्ट्र टाइम्स कॉम २२ मे २००८

ISSN-2581-8848

४) देशमुख (बा.न.) आणि पटवर्धन (गंगूताई), संपा, स्त्री जीवन विषयक स्थित्यंतर - पुणे परिसर भाग - १ - प्रकाशक - भारतीय इतिहास संकलन समिती, पुणे पृ - ७

५) सुमती लांडे आणि श्रुती तांबे - संपादन - स्त्री वाद - प्रकाशक शब्दालय प्रकाशन - श्रीरामपूर - पृ - ६९, २९२, १३१.

६) धाबरे एस. आर. महिला सक्षमीकरण - नवज्योत रिसर्च जनरल - हौसा प्रकाशन - अमरावती - पृष्ठ - ७६.